(173)

f-197

क्रमांक:जमीन-२६९४/१३८३/प्र.क्र.५६२९/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १५ जानेवारी, १९९९.

विषय:- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा

मौ. वर्सोवा स. नं. १६१ खाडीलगत जमिनीच्या अभिन्यास क्र. १ मधील भूखंड क्र. ८ [तळपृष्ठनिर्देशांकासह चटईक्षेत्र १३०५. ३० चौ. मी.] सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टला देण्याबाबत.

ज्ञापन:-

उपरोक्त विषयाबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक १२/३ब/एस-०११७, दिनांक १३. ७. ९८ व शासन पत्र समक्रमांक दि. १८. ६. ९८ च्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौ. वर्सोवा स. नं. १६१ खाडीलगत जमिनीच्या अभिन्यास क्र. १ मधील भूखंड क्र. ८ [तळपृष्ठनिर्देशांकासह चटईक्षेत्र १३०५. ३० चौ. मी.] सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टला संस्थेच्या संकल्पित इमारतीच्या बांधकामासाठी [कॉन्फरन्स हॉल, ग्रंथालय, मेडिकल सेंटर, रिक्रीएशन सेंटर, स्टाफ व गेस्ट रूम] मंजूर करण्याची विनंती संस्थेने केली होती. संस्थेचा सदर विनंती शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, मौ. वर्सोवा स. नं. १६१ खाडीलगत जमिनीच्या अभिन्यास क्र. १ मधील भूखंड क्र. ८ [तळपृष्ठनिर्देशांकासह क्षेत्र १३०५. ३० चौ. मी. ] सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट या संस्थेस वर नमूद केलेल्या प्रयोजनार्थ शासन निर्णय दिनांक ३०. ६. ९२ व शा. नि. दि. २०. ७. ९५ मधील तरतुदीनुसार जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्षे आधीच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या बाजारमुल्याच्या ५० % रक्कम वसूल करून तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०८३/७११३४/प्रकरण ३४७८/ग-६ दिनांक ८. ३. ८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी व शर्तीवर व खालील अतिरिक्त अटींवर मंजूर करण्यात यावा.

१] सध्या संस्थेकडून शीघ्रसिद्धगणकानुसार [रु. ६०००/- प्रति चौ. मी. ] या तात्पुरत्या मुल्यांकनानुसार ५० % सवलतीची कब्जेहक्काची रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच अंतिम मुल्यांकन नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाने निश्चित केल्यावर ते तात्पुरत्या मुल्यांकनापेक्षा जास्त ठरल्यास फरकाची रक्कम व्याजासह ... भरण्यात येईल, असे मुद्रांकित हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे.

14 JAN 1999

२१/००

२] संस्थेस अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर झाल्यास शासन ठरविल त्याप्रमाणे कब्जेहक्काची अतिरिक्त रक्कम भरणा करावी लागेल.

३. वरीलप्रमाणे तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम भरणा करुन घेऊन व फरकाची रक्कम व्याजासह भरणा करण्याबाबत लेखी मुद्रांकित हमीपत्र घेऊन जागेचा प्रत्यक्ष ताबा संस्थेस देण्यात यावा.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने [ अनौ. संदर्भ क्र. प्र. क्र. ७५५/व्यय-२, दिनांक १८. ९. ९८ ] निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ द. वि. फाटक ]
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा
एम. एम. आर. डी. इमारत
वांद्रे [पूर्व], मुंबई:- ४०० ०५१.

प्रत माहितीसाठी सविनय अग्रेषित:-

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२] जमाबंदी आयुक्त व संचालक, भू मी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३] उपसंचालक, भूमि अभिलेख कोकण प्रदेश, मुंबई.
४] महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५] महालेखाकार [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६] वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७] समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
८] निवडनस्ती [ज-३ कार्यासन]

(२३१)

क्र. ११४/जम/कक्ष [illegible]

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जि. [illegible]
[illegible]
वांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

दिनांक :– २४-८-९९

वाचले :– १) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन-२८९९/११८२/प्र.क्र. ५४९७/ ज-३, दिनांक ५.१.१९९९
२) या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दिनांक १९.१.१९९९
३) सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टचे पत्र दिनांक १०.८.१९९९ व दिनांक १७.८.१९९९
४) ट्रस्टने दिनांक १.९.१९९९ रोजी केलेला करारनामा.

---

**आदेश :–**

उपरोल्लेखित अ.क्र. १ कडे मंजूर केलेल्या दिनांक ५.१.१९९९ च्या शासन ज्ञापनाचे मौजे वर्सोवा, तालुका अंधेरी येथील स.नं. १८१ मधल्या शासकीय जमीनीवर अभिन्यास क्र. १ मधील भूखंड क्र. ८, क्षेत्र १७०० चौ.मी., त्यावरील आधाऱ्या वरील २३७.६ चौ.मी. अतिरिक्त चटई निर्देशांकासह (एकूण १३०५.३० चौ.मी. चटई क्षेत्र) सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टला, संस्थेच्या प्रस्तावित इमारतीच्या बांधकामासाठी (कॉन्फरन्स हॉल, ग्रंथालय, मेडिकल सेंटर, रिक्रिएशन सेंटर, स्टाफ व गेस्ट रूम) शासन निर्णय दिनांक ३०.६.१९९२ व शासन निर्णय दिनांक २०.७.१९९२ मधील तरतुदींनुसार, जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्षे आधीच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या बाजारमूल्याच्या ५०% रक्कम वसूल करून तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलआरएक-१०८३/७११३५/प्रकरण-३५७८/ग-६, दिनांक ८.२.१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी/शर्तीवर व खालील अतिरिक्त अटींवर मंजूर करण्यास मान्यता दिली आहे.

१) सध्या संस्थेकडून श्रीघ्रसिद्धगणकानुसार रु. ६,०००/– प्रती चौ.मी. दर या तात्पुरत्या मूल्यांकनानुसार ५०% सवलतीची कब्जेहक्काची रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच अंतिम मूल्यांकन नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाचे निश्चित केल्यावर ते तात्पुरत्या मूल्यांकनापेक्षा जास्त आल्यास फरकाची रक्कम व्याजासह भरण्यास संस्था तयार असल्याबाबत संस्थेकडून मुद्रांक शुल्क पेपरवर हमीपत्र प्राप्त करून घ्यावे.

COLLECTOR OF MUMBAI SUBURBAN DISTRICT
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

७) संस्थेस अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यास शासन ठरविल त्याप्रमाणे कब्जेहक्काची अतिरिक्त रक्कम संस्थेस भरणा करावी लागेल.

उपरोक्त शासनाच्या आदेशानुसार संस्थेस या कार्यालयाच्या, उपरोल्लिखित अ.क्र. ७ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ३१.१.१९९९ च्या पत्राचे कळविल्यानुसार संस्थेने दिनांक १ जानेवारी,१९९७ रोजीचे जमिनीचे तात्पुरते मूल्यांकन प्र.चौ.मी.ला रु.६,०००/- च्या ५०% म्हणजे रु.३,०००/- या सवलतीच्या दराने जमिनीची तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम रु.३९,१५,१००/- [रुपये एकोणचाळीस लक्ष पंधरा हजार शंभर मात्र] डिमांड ड्राफ्टने या कार्यालयात भरणा केली आहे. तसेच जमिनीची अंतिम कब्जेहक्काची रक्कम तात्पुरत्या कब्जेहक्काच्या रकमेपेक्षा जास्त आल्यास दोहोंमधील फरकाची रक्कम विहित व्याजदराने भरण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र संस्थेने दिले आहे. जमीन मंजूरीच्या शासनाच्या अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा संस्थेने दिनांक १.७.१९९९ रोजी केलेला आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या अटी व करारनाम्यातील अटी/शर्तींना अधीन राहून प्रश्नाधीन जमीन संस्थेस मंजूर करण्यात येत आहे. जमिनीचा ताबा व मालमत्ता कार्ड घेण्यासाठी संस्थेने नगर भूमापन अधिकारी अंधेरी/तहसिलदार अंधेरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/xxx
[व. ल. गायकवाड]
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,

श्री राम मोहन,
ट्रस्टी,
सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट,
डी/२०१, ज्ञानदीप अपार्टमेंट,
रविराज ओबेरॉय कॉम्प्लेक्स,
न्यु लिंक रोड, अंधेरी[प],
मुंबई-४०० ०५३.

प्रतिलिपी :- मा. प्रधान सचिव [महसूल], महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे शासन ज्ञापन क्र. जमीन-२६९४/१३८३/प्र.क्र. ५६२९/ज-३, दिनांक ५.८.१९९९ च्या अनुषंगाने माहिती

(233)

-: ३ :-

प्रतिलिपी :- नगर भूमापन अधिकारी अंधेरी/तहसिलदार अंधेरी यांजकडे रवाना.

२/- त्यांनी प्रश्नाधीन जमीनीचा ताबा संबंधित देऊन ताबा पावती, जमीनीचा नकाशा व सुधारीत मालमत्ता कार्डाचा उतारा यासह त्वरीत अहवाल सादर करावा.

मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

मे१७९९९

Received 14/9/97

14/9/97

TSCUW

(325)

क्रमांक :- जमीन-२६१४/१३८३/प्र.क्र. ५६२९ /ज-३
**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- १४ ऑगस्ट २००२.

**विषय :-** जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट या संस्थेस त्यांच्या कॉन्फरन्स हॉल /ग्रंथालय / मेडिकल सेंटर इत्यादी प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या मौ.वर्सोवा, स.नं. १६१ खाडी जमिनीच्या अभिन्यास क्रमांक-१ मधील भूखंड क्र. ८ ऐवजी मौजे आंबिवली स.नं. १४१-अ मधील भूखंड क्र. ३ च्या प्रस्तावित अभिन्यासातील भूखंड मंजूर करणेबाबत.

Urgently issued new ... of ... Bme

**ज्ञापन :-**

उपरोक्त विषयासंबंधी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्या पत्र क्रमांक -१२/३ ब / एफ ०१२६ , दि. २७.५.२००१२ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत कीं, " मौजे वर्सोवा, स.नं. १६१ खाडीलगत जमिनीच्या अभिन्यास क्र. १ मधील भूखंड क्र. ८ मधील १३०५.३० चौ.मी. तळपृष्ठ निर्देशांकासह क्षेत्राचा भूखंड सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट या संस्थेस त्यांच्या संकल्पीत इमारतीच्या बांधकामासाठी (कॉन्फरन्स हॉल ग्रंथालय मेडीकल सेंटर , रिक्रीएशन सेंटर , स्टाफ व गेस्ट क्वार्टस ) शासन निर्णय, दि. ३० .६.१९९२ व शासन निर्णय, दि.२०.७.१९९५ मधील तरतुदीनुसार कब्जेहक्काची किंमत आकारुन समक्रमांक, दि.५.१.१९९९ च्या शासन ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आला आहे. तथापि, प्रश्नाधीन भूखंड सीआरझेडने बाधीत असून त्यावर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार कोणतेही बांधकाम अनुज्ञेय नसल्याने सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टेन पर्यायी भूखंड मंजूर करणेबाबत केलेली विनंती शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, प्रस्तुत संस्थेस पूर्वीचे " मौजे वर्सोवा, स.नं. १६१ खाडीलगत जमिनीच्या अभिन्यास क्र. १ मधील भूखंड क्र. ८ मधील १३०५.३० चौ.मी. (तळपृष्ठ निर्देशांकासह) जमीन मंजूरीचे दि. ५.१.१९९९ चे आदेश रद्द करुन मौजे आंबिवली स.नं. १४१ अ मधील भूखंड क्रमांक- ३ बाबत जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावित अभिन्यासातील ३-अ मधील विकास रस्त्याच्या तळपृष्ठ निर्देशांकासह एकूण ११५६.०१ चौ.मी. क्षेत्राचा पर्यायी भूखंड सिनेआर्टीस्ट वेल्फेअर ट्रस्ट या संस्थेस संकल्पीत इमारतीच्या बांधकामासाठी शासन निर्णय दिनांक ३० .६.१९९२ मधील तरतुदीनुसार व शासन परिपत्रक दि. ८.२.१९८३ मधील अटी व शर्ती आणि जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी तसेच खालील विशिष्ट अटींवर मंजूर करण्यात यावा.

F126 अव

अटी :- १) जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावित अभिन्यासास मुंबई महानगरपालिकेची मान्यता मिळाल्यानंतरच प्रश्नाधीन भूखंडाचा संस्थेस ताबा देणेत यावा.

२) मौजे वर्सोवा स.नं. १६१ , अभिन्यास क्रमांक- १ च्या भूखंड क्रमांक- ८ मधील १३०५ चौ.मी. क्षेत्रासाठी तात्पुरती कब्जेहक्काची किंमत रु. ८९,१५ ९००/- संस्थेने शासन जमा केली असल्याने प्रश्नाधीन भूखंडाबाबत शासन निर्णय, दि.३० .६.१९९२ मधील तरतुदीनुसार नव्याने तात्पुरती कब्जेहक्काची किंमत आकारण्यात येऊ नये, मात्र सदर भूखंडाची शासन निर्णय दि.३०.६.१९९२ मधील तरतुदीनुसार अंतीम कब्जेहक्काची किंमत

... 17 AUG 2002
1776२ 1178

• नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाकडून निश्चित करुन फरकाची रक्कम व्याजासह भरणा करण्यास तयार असलेबाबत संस्थेकडून लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

३. हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने ( अनौपचारिक संदर्भ क्रमांक- प्र.क्र.१३१ /०२ / व्यय-९,दिनांक- ६.८.२००२ ) निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शिवाजी पाटणकर)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
बांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

**प्रतिलिपी :-**

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा)
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई
६) कार्यासन अधिकारी, व्यय -९ ,मंत्रालय,मुंबई -३२
७) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

(375)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५९६८०९, E mail – coilrmsd@yahoo.com

क्रमांक : ०२/१४१अ/३क/एफ-०१९७
दिनांक : २८ /०७/२००३

**वाचले :** १) या कार्यालयाचा आदेश क्र.१२/३ब/एफ-०१९७ दिनांक १४.९.१९९९
२)शासन महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्र.जमीन-२६९४/१३८३/प्र.क्र.५६२९/ज-३
दि.१४.८.०२ व दि.२०.१.०३
३) या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दि.३.२.०३ व दि.२३.७.०३
४) सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट बरोबर दिनांक २८/७/०३ रोजी करण्यात आलेला करारनामा.

**आदेश :**

उद्देशिकेत अ.क्र.१ कडे नमूद केलेल्या या कार्यालयाच्या आदेशाने सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टला संकल्पित इमारतीच्या बांधकामासाठी (कॉन्फरन्स हॉल, ग्रंथालय, मेडिकल सेंटर, रिक्रीएशन सेंटर, स्टाफ व गेस्ट रुम) मौजे वर्सोवा येथील स.नं.१६१ लगतच्या खाडी जमिनीचा अभिन्यास क्र.१ मधील भूखंड क्र.८ मंजूर करण्यात आला असून जमिनीचा ताबा ट्रस्टला दि.२३.१२.१९९९ रोजी देण्यात आला आहे. ट्रस्टला प्रदान केलेला भूखंड सीआर झेड ने बाधीत असल्याने व त्यावर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार कोणतेही बांधकाम अनुज्ञेय नसल्याने ट्रस्टला पर्यायी भूखंड मंजूर करण्याबाबत केलेली विनंती विचारांत घेऊन उद्देशिकेत अ.क्र.२ कडे नमूद केलेल्या दि.१४.८.०२ च्या शासन ज्ञापनान्वये मौजे आंबिवली येथील स.नं.१४१ अ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र.३अ पर्यायी भूखंड म्हणून ट्रस्टला ज्या कारणासाठी पूर्वी जमिन मंजूर केली होती त्याच कारणासाठी मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे शासन ज्ञापनातील निर्देशानुसार मौजे वर्सोवा येथील जमिन ट्रस्टला मंजूर करण्याबाबत काढण्यात आलेला या कार्यालयाचा दिनांक १४.९.१९९९ चा आदेश रद्द करण्यात येत आहे.

उद्देशिकेत अ.क्र.२ कडे नमूद केलेल्या ज्ञापनान्वये मौजे आंबिवली येथील स.नं.१४१अ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र.३अ विकास रस्त्याच्या तळपृष्ट निर्देशांकासह एकुण ११५६.०९ चौ.मीटर क्षेत्राचा भूखंड शासन निर्णय दिनांक ८.२.१९८३ व ११.५.१९८४ मधील तरतूदी नुसार ट्रस्टला मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तथापी मुंबई महानगर पालिकेने मंजूर केलेल्या अभिन्यासानुसार असलेले प्रश्नाधीन भूखंड क्र.३अ चे क्षेत्र १०९०.० चौ.मीटर अधिक अतिरिक्त चटई क्षेत्र २५७.३८ चौ.मीटर मिळून एकूण १३४७.३८ चौ.मीटर चटई क्षेत्र संस्थेस मंजूर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

मौजे वर्सोवा येथील भूखंडासाठी ट्रस्टने तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम रु.३९,१५,९००/- (रु.एकोणचाळीस लक्ष पंधरा हजार नऊशे मात्र) या कार्यालयात भरणा केली असल्याने ती मेळात घेण्यात येत असून पर्यायी भूखंडासाठी आता

किंमत

तात्पुरती कब्जेहक्काची किंमत न आकारता जमिनीची अंतीम कब्जेहक्काची निश्चित करुन घेण्यात आल्यावर ती तात्पुरत्या किंमतीपेक्षा जास्त आल्यास, फरकाची रक्कम त्याप्रमाणे ट्रस्टला कळविण्यात आल्याच्या तारखेपासून विहित व्याजदराने वसून करण्यात येईल. विहित व्याजासहीत फरकाची कब्जेहक्काची रक्कम भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र ट्रस्टने दिले आहे. तसेच शासनाच्या अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा ट्रस्टने दिनांक २८/७/२००३ रोजी केला असल्याने त्यामधील अटी/शर्तीना अधीन राहून प्रश्नाधीन १३४७.३८ चौ.मीटर चटई क्षेत्राचा भूखंड सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टला मंजूर करण्यात येत आहे. जमिनीचा ताबा घेण्यासाठी ट्रस्टला नगर भू-मापन अधिकारी, अंधेरी/तहसिलदार अंधेरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. पर्यायी जमिनीचा ताबा घेण्यापूर्वी ट्रस्टने पूर्वी प्रदान झालेल्या वर्सोवा येथील जमिनीचा ताबा नगर भू-मापन अधिकारी, अंधेरी यांचे मार्फत पुन्हा शासनाकडे द्यावा.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति
सचिव,
सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट,
२२०, कार्तिक कॉम्पलेक्स,
न्यू लिंक रोड, अंधेरी (प),
मुंबई-४०० ०५३.

**प्रतिलिपी :**

१) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) नगर भू-मापन अधिकारी, अंधेरी/तहसिलदार अंधेरी यांजकडे रवाना.

२/- सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्टला मौजे वर्सोवा येथील जमिन मंजूर करण्याबाबत दि.१४-१-१९९९ रोजी काढलेला आदेश आता या आदेशान्वये रद्द करुन ट्रस्टला मौजे आंबिवली येथील प्रश्नाधीन जमिन मंजूर करण्यात आली असल्याने मौजे वर्सोवा येथील प्रस्तुतच्या जमिनीच्या अभिलेखामध्ये असलेले ट्रस्टचे नांवे रद्द करुन जमिन शासनाचे नांवे दाखल करावी. तसेच मौजे आंबिवली येथील जमिनीचा ताबा ट्रस्टला देऊन ताबा पावती, नकाशा व सुधारीत मालमत्ता कार्डाचा उतारा यांसह पुर्तता अहवाल सादर करावा.

मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे.

२०५.

(सही) 28/7/03
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

Received
Kmenon
28/7/03

२८५

A:\F-0197.doc/C-4